# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - II - PAPER - IV

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

उ.१ अ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i) **सडपातळ भाज्या**
- शेवग्याच्या शेंगा
- भेंडी
- पडवळ
- चवळीच्या शेंगा

(ii) **पंतांना उपदेश करणाऱ्या व्यक्ती**
- जगदाळे
- कु. कमलिनी केंकरे

(२) **योग्य जोड्या जुळवा.** **2**

| | 'अ' गट | उत्तरे |
|---|---|---|
| (i) | बिनसाखरेचा चहा | कडू |
| (ii) | कोबी | बाळसेदार भाजी |
| (iii) | पडवळ | सडपातळ भाजी |
| (iv) | कुंभ | रास |

(३) **व्याकरण :**

**(i) समानार्थी शब्द लिहा.** **1**

(अ) पहाट - सकाळ (आ) विवाह - लग्न

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

(अ) गोड × कडू (आ) वर्णनीय × अवर्णनीय

(४) **स्वमत :** 2

पंतांनी डाएट सुरू केल्यापासून त्यांच्या धर्मपत्नीचा उत्साह अवर्णनीय होता. रोज चमत्कारिक पदार्थ यांच्या पानात पडू लागले. बाळसेदार भाज्यांची स्वयंपाक घरातून हकालपट्टी केली व सडपातळ भाज्यांचा खुराक सुरू केला. सकाळचा चहा देखील सुरुवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल याची पंतांना कधीच कल्पना आली नाही पत्नीला यासंबंधी विचारले असता कुटुंबाने खुलासा केला की सुरुवातीचा चहा बिनसाखरेचा नव्हताच मुळी. त्यानंतर पंतांना समजले की बिनसारखेचा चहा कडू लागतो.

उ.१ आ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

सुमितने पावडेकाकांना विचारलेले प्रश्न →
- "आता तुम्ही कुठून आलात?"
- "कसे?"
- "तुम्ही एकटेच ये-जा करता?"
- "आठवड्यातून तुमचं फिरणं किती होतं?
- "तुम्ही काही झाडं लावली आहेत का?"

(२) **योग्य जोड्या जुळवा.** 2

| | 'अ' गट | उत्तरे |
|---|---|---|
| (i) | फूटप्रिन्टस | स्वच्छता ॲप |
| (ii) | पर्यावरण पुरक | रेखामावशी |
| (iii) | पर्यावरण मारक | पावडे काका |
| (iv) | चंदेरी वर्खात मढवलेली | पावलं |

(३) **व्याकरण :**

**(i) सूचनेनुसार कृती करा.** 1

शब्दयोगी अव्यय - सारखा

**(ii) अधोरेखित नामाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** 1

रेखामावशींनी <u>झाड</u> लावले.

(४) **स्वमत :** 2

रेखामावशी कोणत्याही धूर सोडणाऱ्या वाहनाने ये-जा करत नसत. शक्यतो त्या पायीच ये-जा करायच्या. कधी-कधी सायकल वापरायच्या म्हणजे हवेत कार्बनडायऑक्साईड मिसळण्याची जी प्रक्रिया होते, त्यात त्यांचा अजिबात सहभाग नव्हता. त्यांनी त्यांच्या झोपडीपुढे दोन झाडं लावली होती. त्यातलं एक पर्यावरणास पूरक लिंबोणीचं होतं. ही झाडे लावून त्यांनी पर्यावरणाला मदतच केली होती.

| | | |
|---|---|---|
| उ.१ इ. | **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** | |
| (१) | **खालील कृतीचा परिणाम लिहा.** | **2** |
| | (i) मुंबईच्या स्टेशननजीक राहणारे कुठे परगावी गेले तर आगगाड्यांच्या धडधडाटाशिवाय झोप येत नाही. | |
| | (ii) ट्रान्झिस्टर लावून अभ्यास करणाऱ्यांना ट्रान्झिस्टर नसला तर त्यांचा अभ्यास व्हायचा नाही. | |
| (२) | **खालील शब्दांचा सहसंबंध लिहा.** | **2** |
| | (i) आगगाड्यांचा : धडधडाट :: इंजिनांच्या : कर्कश शिट्या | |
| | (ii) बस : रांग :: मनाची : एकाग्रता | |
| (३) | **व्याकरण :** | |
| | **सूचनेनुसार सोडवा.** | **2** |
| | (i) भूतकाळ | |
| | (ii) कर्कश - विशेषण | |
| (४) | **स्वमत :** | **2** |
| | माणसाने कधीही सवयीचे गुलाम नसावे. मनुष्याला खूप वेगवेगळ्या प्रकारच्या सवयी असतात. मग त्या रोजच्या जीवनातील असू द्यात किंवा त्याच्या नित्य कामातील असू द्यात. व्यक्ती सवयीचा इतका गुलाम असतो की, त्याशिवाय त्याचे पानही हलत नाही. | |
| | उदा. (१) एखाद्या व्यक्तीस ठरलेल्या वेळेत जेवण मिळाले नाही तर त्याची चिडचिड होते. तो घरातील स्त्रीयांवर राग व्यक्त करतो. आवडता पदार्थ पानात वाढला गेला नाही तर तो जेवतही नाही. | |
| | उदा. (२) एखाद्या विद्यार्थ्यास खूप वेळपर्यंत झोपण्याची सवय असेल तर अचानक एखाद्या दिवशी त्याला लवकर उठावे लागले तर तो पूर्ण दिवस बसून दिसेल तेथे डुलक्या काढताना दिसतो. त्या अपूर्ण झोपेचा परिणाम त्याच्या पूर्ण दिवसाच्या कामावर दिसून येतो. माणसाने प्रत्येक गोष्टीला प्रसंगानुसार सामोरे जावे. त्याने दोन्ही गोष्टी सकारात्मक विचाराने स्वीकारल्या पाहिजेत. मग बघा आयुष्य किती सुंदर आहे. म्हणून कोणत्याही माणसाने सवयीचे गुलाम नसावे. | |
| | **विभाग २ – पद्य** | |
| उ.२ अ. | **खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** | |
| (१) | **(i) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** | **1** |
| | चातक पक्षी मेघांची (ढगांची) विनवणी करतो. | |
| | **(ii) खालील कंसातील योग्य पर्याय निवडून ओळ पूर्ण करा.** | **1** |
| | भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।। | |

(२) **(i) खाली दिलेल्या अर्थाची ओळ अभंगातून शोधून लिहा.** 1

सर्वेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।

**(ii) कोण ते लिहा.** 1

पाडसासाठी चिंतीत होणारी - हरिणी

(३) **खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.** 2

वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक संत नामदेव महाराज अगदी मनापासून आर्तपणे विठ्ठलाचा धावा करतात. त्यासाठी ते अतिशय समर्पक दृष्टान्त देतात. ते म्हणतात की, ज्याप्रमाणे नजरचुकीने अग्नित सापडलेल्या बाळाला वाचवण्यासाठी त्याची आई व्याकूळ होऊन , काळजीने त्याच्याजवळ धावून जाते. त्याला मायेने, प्रेमाने उचलून घेते. त्याचप्रमाणे हे प्रभू, विठ्ठला, मी पूर्णपणे तुझा अंकित आहे. मी तुझा दास, सेवक आहे. आईप्रमाणे तुम्ही माझ्या अडचणीत, माझ्या कार्यात व्याकूळ होऊन धावत ये.

(४) 'घार उडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी' असे म्हटले जाते. त्याप्रमाणे कोणत्याही प्राण्यांची, पशूंची, पक्ष्यांची आई असो ती आपल्या मुलांसाठी अतिशय सतर्क, व्याकूळ असते. साधी रस्त्यावर राहणारी कुत्री घ्या. ती कुत्री आपल्या पिल्लांचा कसा सांभाळ करते ते आपण अनेकवेळा पाहिले आहे. कांगारू आपल्या पिल्लास संकटाच्या वेळी आपल्या पोटात घेते. माकडीन आपल्या पिल्लास पोटाशी धरून इकडून तिकडून उड्या मारते. कोंबडी आपल्या पिल्लांचा सांभाळ कशी करते ते आपण अनेकवेळा पाहतो. कोणतेही संकट येताच ती पिल्लांना आपल्या दोन्ही पंखाखाली घेते. तसेच ती आपल्या पिलांवर झेप घालणाऱ्याला चोच मारून दूर करण्याचा प्रयत्न करते.शेवटी सगळ्यांची आई ही सारखीच असते. ती भारतातील असो, अमेरिकेतील असो, पक्षी असो वा पशू असो आईचे प्रेम हे आपल्या मुलांवर सारखेच असते. 2

उ.२ आ. **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**

(i) **दोन दिवस**

(१) **कवी/कवयित्री : –** 1

नारायण सुर्वे

(२) **कवितेचा रचनाप्रकार : –** 1

'दोन दिवस' या कवितेचा रचनाप्रकार 'मुक्तछंद' हा आहे.

(३) **कवितेचा काव्यसंग्रह : –** 1

'दोन दिवस' ही कविता 'ऐसा गा मी ब्रह्म!' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

(४) **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –** 1

'दोन दिवस' या कवितेतून 'दु:ख' हा स्थायी भाव दिसून येतो.

| | | |
|---|---|---|
| (५) | **कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;<br>भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. | **2** |
| (६) | **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>कवी नारायण सुर्वे यांची 'दोन दिवस' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भाकरीचा चंद्र शोधण्यात ज्यांची जिंदगी बरबाद होते त्या सगळ्या कष्टकरी, कामगार, श्रमिक, गरीब लोकांचा सोशिकपणा, त्यांचा संयम, त्यांचे दु:ख कवीने सहजपणे वाचकांसमोर मांडले आहे. कवीने वेदनेचा भाव कोणत्याही प्रकारची चीड, संताप किंवा आक्रस्ताळेपणाने न मांडता अत्यंत संयमी आणि सुयोग्य प्रतिकांचा वापर करून मांडले आहे. सर्वस्व असलेले हात, माना उंचावलेले हात, कलम झालेले हात यांसारखी प्रतिके मनाला अंतर्मुख करून जातात. त्यामुळेच ही कविता मनाला भिडते. | **2** |
| (ii) | **योगी सर्वकाळ सुखदाता** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>संत एकनाथ | **1** |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' ही कविता एक 'अभंग' आहे. | **1** |
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग 'एकनाथी भागवत' शासकीय प्रत' या संग्रहातून घेतला आहे. | **1** |
| (४) | **कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातून 'शम (शांती)' हा स्थायी भाव दिसून येतो. | **1** |
| (५) | **कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>जळ वरीवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।।<br>उदक करी सुखी एकवेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।। | **2** |
| (६) | **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>संत एकनाथांनी योगी पुरूष आणि पाणी यांचे समाजासाठीचे योगदान दाखवून दिले आहे. चंद्रकिरण व चकोर, पांखोवा व पिल्ले, जीवन (पाणी) व जीव या उदाहरणांच्या अप्रतिम वापराने मनातील भाव समर्पकरित्या व्यक्त झालेला आहे. त्यामुळे हा अभंग मनापर्यंत पोहोचतो. मेघांचे रूपक घेऊन योगी पुरूषांचे खालुते येणे ही एकनाथ महाराजांनी योजलेली कल्पना मनाला भावल्यामुळे हा अभंग मला खूप आवडला आहे. | **2** |

| | | |
|---|---|---|
| उ.२ इ.<br>(१) | **खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>वरील काव्यपंक्ती 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातल्या आहेत. येथे संत एकनाथ यांनी योग्यांची महानता पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे सिद्ध केले आहे.<br>पाण्यापेक्षाही योगी पुरुषाचे श्रेष्ठत्व स्पष्ट करताना एकनाथ महाराज म्हणतात की, पाण्याचा गोडवा जिभेला  कळतो. तो जिभेपुरता मर्यादित असतो. परंतु योग्याच्या सहवासाने लाभलेले माधुर्य मनुष्याच्या सर्वच इंद्रियांना संतुष्ट करते मानवी मनातील कटुता नष्ट होऊन मनाला एक आंतरिक समाधान लाभते ते चिरकाल टिकणारे असते.<br>मधुरता व गोडपण यांची साम्यता दर्शवून योगी हे किती श्रेष्ठ आहे हे खुबीने दाखवून काव्यसौंदर्य निर्माण झाले आहे. कवीची भाषाशैली साधी पण अर्थपूर्ण आहे. येथे शांतरस दिसून येतो. | 4 |
| | **विभाग ३ – स्थूलवाचन** | |
| उ.३.<br>(१) | **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**<br>महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे. आधी केले, मग सांगितले या उक्तीप्रमाणे सर्व संतांनी कार्य करून दाखवले आहे.<br>उदाहरणे द्यायचीच तर संतांनी प्राण्यांवर दया करण्याचा संदेशआपल्या अभंगातून फक्त दिला नाही तर संतांनी ते करूनहीदाखवले.संत नामदेव भुकेल्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन धावत गेले. संत एकनाथांनी भर उन्हात तडफडत असणाऱ्यागाढवाला काशीहून आणलेल्या गंगेचे पाणी पाजून समाजापुढे एकनवा आदर्श ठेवला.<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व थोर समाजसेवक वसमाजसुधारक गाडगे महाराज यांनी स्वत: आधी हातात झाडू घेऊनगावातील केरकचरा दूर करण्यापासून ते विष्ठा उचलण्याची कामेकेली. देवाच्या नावाने कर्मकांड करण्यापासून अडवले. मूर्तीपूजा नकरता गोरगरीब मानवाची पूजा करा, त्यांची सेवा करा हे लोकांनाआपल्या कीर्तनाच्या माध्यमातून पटवूनही दिले.<br>बाबा आमटे हे ही आधुनिक काळातील राष्ट्रसंतच म्हटलेपाहिजेत. रस्त्यावर महारोग होऊन पडलेल्या तुळशीरामला पाहूनत्यांच्या मनात कुष्ठरोग्यांच्या बद्दल सेवाभाव जागृत झाला वत्यातूनच चंद्रपूर येथे 'आनंदवनाची' निर्मिती झाली. त्यांनी केलेल्याकामाची दखल घेत पाश्चात्य देशांनी त्यांना पुरस्कृतही केले. या सर्व उदाहरणांवरून 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीचीसार्थकता स्पष्ट झाल्यासारखे वाटते. | 3 |
| (२) | वेगवेगळ्या ठिकाणचा सूर्यास्त वेगवेगळे सौंदर्य, वेगळे भाव, वेगळे रंग निर्माण करत असतो. माणसाची मनोदशा जशी असेल तसे भावतरंग सूर्यास्ताच्या वेळी त्याच्या मनात निर्माण होत असतात.<br>वाळवंटाच्या ठिकाणचा सूर्यास्त. वाळूच्या विस्तीर्ण पसरलेल्या अथांग भूप्रदेशावर सोनेरी मऊसार किरणे पसरवत असतो. मन अगदी तृप्त करून तो अस्ताला जातो. तेथील वाळूचा सागर हळूहळू थंड होत जातो. शितल वाऱ्याच्या झुळका वाहू लागतात. मानव, पशू, पक्षी सुखावून जातात. वाळूचा थंड स्पर्श, वाऱ्याची थंड झुळूक यामुळे मानवी मन सुखावून जाते. त्या सुवर्णमयी वातावरणात नव्या संकल्पना, जुन्या संवेदना जाग्या होतात. कवी, लेखक, चित्रकार यांना नवीन कल्पना सुचतात. | 3 |

समुद्राच्या ठिकाणी अस्ताला जाणाऱ्या सूर्यास्ताचे दर्शन मोठे विलोभनीय असते. हळू हळू सागराच्या कुशीत सामावणाऱ्या सूर्याला बघून वाटते की, हा सागरात मिसळून जातो. म्हणूनच चमकदार मोती निर्माण होतात. सुंदर रंगीत प्रवाळ आणि अनंत असे जीव निर्माण होतात. समुद्राच्या लाटांसोबत हेलकावे खात हा तेजोगोल जेव्हा सागरात सामावतो तेव्हा आपोआप त्या सृष्टीकर्त्या पुढे आपण नतमस्तक होतो.

(३) लेखक ट्रेनिंग स्कूल मधील प्रशिक्षण संपवून बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाले. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला त्यांना सांगण्यात आले. त्यासाठी लागणारी सामग्री तिथे होती, पण आतापर्यंत ती कोणीही वापरलेली नव्हती. त्यामुळे लेखक म्हणाले की, ते काम करण्यास तयार आहेत, केवळ त्यांना मदतीसाठी एक वेल्डर आणि एक फोरमनची गरज आहे. त्यावेळी त्यांना नकार देण्यात आला. आपल्याला स्वत:लाच सगळे करावे लागेल असेही सांगण्यात आले. वरिष्ठांची आज्ञा म्हणून लेखकाने सुरुवात केली. बरीच धडपड करून लेखकाने ते काम पूर्ण केले. मग वरिष्ठांकडून या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्यात आली. 'हे करूया, ते करूया', असे बरेच काही काही बोलले गेले. नंतर वरिष्ठांनी लेखकाला विचारले की, ''आता सांग, तुला काय काय पाहिजे ? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आणखी काही हवे असेल तर तेही मिळेल.'' त्यावेळी लेखक म्हणाले की, ''मला आता काहीच नको. मी स्वत: सगळे काम करीन.'' त्यावेळी लेखकाला सांगण्यात आले की, काम सुरू करण्याआधीच लोक वेगवेगळ्या मागण्या करतात आणि त्यांच्या या वृत्तीमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम अजिबात झालेले नव्हते. स्वत:ला काम करता येत नसताना दुसऱ्यांवर काम ढकलण्याच्या प्रक्रियेमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम सुरू झालेले नव्हते, असे मला वाटते. 3

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | सप्ताह | सात दिवसांचा समूह | द्विगू समास |
| (ii) | शहरोशहरी | प्रत्येक शहरी | अव्ययीभाव समास |

(ii) **अलंकार** 2

**खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.**

अलंकार = यमक अलंकार

उदा: जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी ।
नि:संदेह मनी । सर्वकाळ ।।

(iii) **वाक्यरूपांतर** 2

**तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्याचा प्रकार | प्रकार बदला |
|---|---|---|
| १. शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. | होकारार्थी वाक्य | शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही कमी केले नाही. |
| २. प्रवासात भरभरून बोलावे. | विधानार्थी वाक्य | प्रवासात भरभरून बोला. |

(iv) **सामान्यरूप** 2

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) दसऱ्याचा सण सर्वांना आनंद देतो.

(ii) एका महिन्यात सर्पदंशाने दोघांचा मृत्यू झाला.

(v) **वाक्प्रचार** 2

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) पावसाळ्यातील इंद्रधनुष्याने माझ्या मनावर किमया केली.

(ii) श्रावण बाळाची गोष्ट ऐकताना मुले - मुली देहभान विसरली.

उ.४ **(आ) भाषासौंदर्य**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

(अ) दान करणारा - दानशूर

(आ) केलेले उपकार जाणणारा - कृतज्ञ

(ii) **समानार्थी शब्द लिहा.** 1

(अ) कीव – दया (आ) भाग्य – नशीब

(iii) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** 1

वर्ष ⟵ साल ⟶ फळावरील आवरण

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** 1

देवदूतासारखा - देव, सारखा, तार, सार, खार, ताव, दूर.

| | | |
|---|---|---|
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन** | |
| | (i) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** | 1 |
| | कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा संमेलने गाजवत. | |
| | (ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** | 1 |
| | (अ) अद्भुत | |
| | (आ) सौंदर्य | |
| (३) | **विरामचिन्हे** | |
| | **खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.** | 2 |
| | (i) ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.'' | |
| | (ii) 'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. | |
| (४) | **पारिभाषिक शब्द** | |
| | **खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** | 1 |
| | १. Absent - गैरहजर     २. Documentry - माहितीपट | |
| (५) | **भाषिक खेळ** | |
| | **खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** | 1 |
| | दंभ, मोह, राग, लोभ | |
| | **विभाग ५ – उपयोजित लेखन** | |
| उ.५ अ. | **खालील कृती सोडवा.** | |
| (१) | **पत्रलेखन** | 5 |
| | दिनांक - २७ जानेवारी, २०१८.<br>प्रति,<br>मा. व्यवस्थापक,<br>ज्ञानसागर ग्रंथ भांडार,<br>महात्मा गांधी रोड,<br>दादर (प.),<br><br>विषय : शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी. | |

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., 'सरस्वती विद्यालय' या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी खालील पुस्तकांची आवश्यकता आहे. तरी कृपया ती पुस्तके शाळेच्या पत्त्यावर त्वरीत पाठवून द्यावीत. सोबत पुस्तकांचे देयक (बिल) पाठवावे. जेणेकरून पुस्तकांची रक्कम त्वरीत देण्याची व्यवस्था करता येईल.

पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| (i) | शिवछत्रपती | श्री. बाबासाहेब पुरंदरे | ०५ |
| (ii) | बटाट्याची चाळ | पु. ल. देशपांडे | १० |
| (iii) | स्वामी | रणजित देसाई | ०७ |
| (iv) | यश तुमच्या हातात | शिव खेरा | ०५ |

वरील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे कृपया पुस्तकांवर योग्य ती सवलत द्यावी,ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी)
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.),
मुंबई

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

माणूस हा सवयीचा गुलाम आहे. गाड्यांच्या धडधड आवाजात गाढ झोपणाऱ्या माणसांना शांततेत झोप येत नाही. रोज टॅक्सीने प्रवास करणाऱ्यांना टॅक्सीची भाडेवाढ झाली आणि टॅक्सीचा प्रवास परवडेनासा झाला म्हणून बसच्या रांगेत उभे राहणे नकोसे होते. थोड्याशा आवाजानेही काहींची एकाग्रता भंग होते तर कानाला ट्रान्झिस्टर लावल्याशिवाय काहींचा अभ्यासच होत नाही. हा सर्व सवयीचा परिणाम आहे.

उ.५आ. **खालील कृती सोडवा.**

(१) **जाहिरात लेखन**

१) **चौकट पूर्ण करा.** 2

(i) **जाहिरातीचा विषय** – रिसॉर्टची जाहिरात

(ii) **रिसॉर्टचे नाव** – गिरीकुंज रिसॉर्ट

२) **रिसॉर्टची वैशिष्ट्ये** 2

- घरच्यासारखे जेवण
- निसर्गसान्निध्य
- धबधबे
- रेन डान्स
- व्हेव पूल

३) **जाहिरातीतील यमक जुळणारे शब्द -** घनदाट घाट 1

४) **रिसॉर्टचे ठिकाण -** देवगिरी मार्ग, लोणावळा 1

(२) **कथा लेखन**

**खालील शब्द गुंफून एक छानशी कथा तयार करा. कथेला शीर्षक द्या.** 6

**भविष्याचा विचार**

आटपाट नगर होतं ! तेथे राजा अरविंदसिंग राज्य करीत होता. राजा अरविंदसिंग हा अत्यंत प्रेमळ, दूरदृष्टीचा व प्रजाहितदक्ष असा राजा होता. तो लोकांची हालहवाल पाहण्यासाठी रात्री बेरात्री वेश बदलून राज्यात फिरत असे. त्याच्या राज्यात सगळी जनता अत्यंत सुखी होती.

एकदा राजा अरविंदसिंग राज्यात फेरफटका मारत असताना एका शेतमळ्यात पोहोचला. तेथे एक म्हातारा माणूस आपल्या थरथरत्या हातांनी खड्डे खणून आंब्याची रोपे लावत होता. ज्या वयात देवाचे नामस्मरण करावे, आराम करावा त्या वयात हे कष्टाचे काम करताना पाहून राजाला आश्चर्य वाटले. तो घोड्यावरून खाली उतरला आणि त्या म्हाताऱ्या माणसाजवळ जाऊन म्हणाला ''आजोबा, तुम्ही या वयात आराम करायचा सोडून इतका वेळ या शेतात काय करीत आहात ?''

''महाराज, मी या मातीत आंब्याची झाडे लावत आहे'' तो म्हातारा माणूस म्हणाला. त्यावर राजा गालातल्या गालात हसला आणि म्हणाला, ''अहो पण आजोबा, आता आंब्याची झाडे लावून काय उपयोग ? या झाडांचे आंबे तुम्हाला खायला मिळतील का ?''

राजाच्या या प्रश्नावर तो म्हातारा माणूस हसला आणि म्हणाला, ''महाराज, ज्या झाडांचे आंबे मी आज खातो आहे ती झाडे मी लावलेली नाहीत. ती झाडे माझ्या आजोबा - पणजोबांनी लावलेली आहेत.'' थोडावेळ थांबून तो पुन्हा म्हणाला ''महाराज, ही झाडे मला आंबे पाहिजेत म्हणून मी लावत नाही. त्याचे आंबे माझी मुले-बाळे, नातवंडे खातील.''

हे उत्तर ऐकून राजा अरविंद सिंगला खूप आनंद झाला. त्याने ताबडतोब कमरेला खोचलेली सोन्याच्या मोहरांची थैली काढली आणि त्या म्हाताऱ्या माणसाला बक्षीस म्हणून दिली.

उ.५ इ. **लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतेही एक कृती सोडवा.**

(१) **निवृत्त शिक्षकाचे आत्मवृत्त** 8

'इतकं दिलंत, इतकं दिलंत मला,
खरंच सांगतो, कृतार्थ केलंत मला ।।'

माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो, तुमच्या प्रेमाने आज मी पावन झालो आहे. अश्रूंनी भरलेले माझे डोळे व कंप सुटलेला हा माझा आवाज हे सगळं तुमच्यावरील माझ्या प्रेमाचं प्रतीकच आहे. आज मी सेवानिवृत्त होतोय पण शिक्षणाच्या सेवेतून नव्हे. ते कार्य अखंडपणे सुरूच राहणार या सृष्टीसारखं. इतकी वर्षं माझ्यासाठी शाळेतील वेळापत्रक महत्त्वाचं होतं, पण उद्यापासून कुठल्याही प्रकारचं वेळापत्रक नसणार. फक्त नि:स्वार्थी शिक्षण देणं हेच माझं कर्तव्य उरेल. मन आणि आत्मा यावर संस्कार म्हणजे शिक्षण असं मानणारा मी इथपर्यंतच्या प्रवासातील आठवणींनी हळवा होतो.

नुकताच सातवी पास झालेलो. स्वातंत्र्याचे वारे त्यावेळी अंतिम ध्येयाकडे वाटचाल करत होते. देशभर चळवळ आंदोलनाच्या स्वरूपात क्रांतीचे वारे वाहत होते. अनेक नेते व त्याच्या प्रेरणेने प्रेरित झालेले कार्यकर्ते हसत-हसत फासावर जात होते. यावेळी गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या संदेशाचा माझ्यावर फार खोलवर परिणाम झाला व घरच्यांच्या विरोधाला न जुमानता ग्रामीण भागात येऊन शिक्षकी पेशाकडे वळलो. पैसा कमावणे हे ध्येय न ठेवता शिक्षण प्रसारासाठी झपाटल्यासारखं काम करू लागलो. गावातील मुलांच्या अज्ञानाला ज्ञानाचा प्रकाश दाखवत 'वाचाल तर वाचाल' व 'शिकाल तर टिकाल' या बाबासाहेबांच्या विचारांना शिकवत होतो. यासाठी प्रसंगी गावातील दादा मंडळींचा रोष पत्करला. जातीभेदाचे विष कमी करण्याचा प्रयत्न केला. यातूनच कितीतरी शिक्षित तरूण तयार झाले. मोठमोठ्या पदावर काम करू लागले. रस्त्यात भेटणारा विद्यार्थी भर रस्त्यात पायाला स्पर्श करतो याचं समाधान वाटत राहील.

त्यावेळी आर्थिक परिस्थिती मात्र बेताचीच होती. एका बाजूला तुटपुंजा पगार तर दुसऱ्या बाजूला वाढलेला संसार. सगळीच तारेवरची कसरत होती. सगळा प्रकार आकाशाला ठिगळ लावण्यासारखा. परंतु खाजगी शिकवणीचा आधार न घेता शिक्षण हे व्रत म्हणून स्वीकारले व आयुष्यभर जपले. शाळेच्या इमारतीतील बदल आता सुखावतो, पण नवे शिक्षक व त्यांचे न पटणारे आधुनिक विचार यामुळे खटके उडणे हे नित्याचेच झाले. वरिष्ठांनीही वरून आदेश पाठविला, जमत नसेल तर सोडा. नशिबाच्या फाटक्या झोळीत मात्र काही उत्साहवर्धक नव्हतं. त्यामुळे मिळणाऱ्या पगारावरच निवृत्तीची वाट पाहू लागलो.

आज तो दिवस उजाडला अन् मी निवृत्त झालो पण उद्यापासून काय ? ४० वर्षाचा ऋणानुबंध संपणार. या शरीराला लागलेली एवढ्या वर्षांची सवय बदलावी लागणार. शाळेची पायाखालची वाट आता बदलणार. आर्थिक बाबतीतही सरकारी दरबारी पेन्शनसाठी खेटे मारावे लागणार. जसा इतरांना सावली देणारा वृक्ष उन्हातच असतो. ऊनपावसाचे चटके सहन करत. शिक्षक व जीवन याचे नातेच उलटे. शिक्षक आधी शिकवतो, मग परीक्षा घेतो. पण जीवन आधी परीक्षा घेते मग जगण्याचा पाठ शिकवते. यामुळे मनाला कधी कधी खूप दु:ख होते. आता हेच पहा ना, वय वाढलं की शिक्षक सक्तीची निवृत्ती घेतो. पण राजकारणी या वयात ऐन रंगात येतात. त्याचं काय ? या सगळ्यावर माझ्याकडे उपाय नाही. परंतु विद्यार्थी हेच आमचं सर्वस्व आहे. त्यांच्याशिवाय सारं व्यर्थ आहे.

(२) **सूर्य मावळलाच नाही तर ! ...** ८

भारत आणि पाकिस्तानचा ऐन रंगात आलेला क्रिकेटचा अटीतटीचा सामना अपुऱ्या सूर्यप्रकाशामुळे थांबवावा लागला. भारताचा हातातोंडाशी आलेला विजयाचा घास या अपुऱ्या सूर्यप्रकाशाने हिरावून घेतला व त्याचबरोबर माझ्या डोक्यात 'सूर्य मावळलाच नाही तर!...' या विचाराने थैमान सुरू झाले.

खरंच! सूर्य मावळला नाही तर काय मज्जा येईल नाही! मनमोकळे हुंदडता येईल, अंधार होणार नाही. मग काय या पृथ्वीतलावर सर्वत्र प्रकाशच प्रकाश असेल. दिव्यांच्या रोषणाईची गरज भासणार नाही अन् भारनियमनाचा त्रासही भोगावा लागणार नाही. सर्वत्र लख्ख प्रकाशाने सारी वसुंधरा झळकून निघेल. वृक्षवल्ली जोमाने वाढू लागतील. कुंजवनातल्या कळ्या उमलू लागतील तर पुष्करणीतील कमळे खुलतील. काय सुंदर कल्पना आहे नाही !

पण सूर्य मावळला नाही तर धरणीवर काय अनर्थ ओढवेल असा अंधुकसा विचार मनाला स्पर्शून गेला व मी भानावर आलो. सूर्याच्या रखरखत्या उन्हाचे चटके दिवसभर सोसावे लागतील. रात्र व दिवस हे गतिमान चक्र पार थंडावून जाईल. सूर्य मावळलाच नाही तर मग साऱ्या सजीव सृष्टीला विसावा देणारी शीतल रात्रही नाही. नभोमंडळातील तारका नाहीत. कवींना भुलविणारा चंद्रमा नाही. सारे तापमान उष्णच उष्ण. अंगाची पार लाही लाही, जीव अगदी त्राहि मांम्. सूर्य सतत आकाशात तळपत राहिल्याने साऱ्या चराचराचा दिनक्रम पार कोलमडून पडेल. लख्ख उजेड असल्याने कष्टकऱ्यांना श्वास घेण्याची उसंत मिळणार नाही व आज ज्याप्रमाणे वीजनिर्मिती करण्यासाठी बुद्धिमान आपली बुद्धि व श्रम कारणी लावतात. त्याप्रमाणे सूर्यकिरणांपासून सजीव सृष्टीचा बचाव कसा करता येईल, त्याचे संशोधन करावे लागेल. थकलेल्या गात्रांना श्रमपरिहाराची डुलकी घेता येणार नाही. झोप नाही मग स्वप्न नाहीत, मनोरथ नाहीत. सारे कसे सूर्य प्रकाशासारखे रखरखीत होईल.

सूर्याच्या उष्णतेमुळे पृथ्वीवरील पर्यावरणाचा समतोल पार विस्कटून जाईल. नदीनाल्यांच्या, समुद्राच्या पाण्याचे बाष्पीभवन होईल, सर्वत्र सुका दुष्काळ पसरेल. अंगातून घामाच्या धारा वाहतील पण घोटभर पाण्यासाठी वणवण फिरावे लागेल. तरीही ते प्राप्त होणार नाही. भांडवलदार आपल्या गिरण्या, कारखाने सतत सुरूच ठेवतील. त्यामुळे मजुरांचे शोषण होईल. साऱ्या पृथ्वीतलावरील सजीव सृष्टीचे चक्रच अस्तव्यस्त होईल. विद्यार्थी वर्गाला मान मोडून अभ्यास एके अभ्यास करावा लागेल, हा विचार डोक्यात चमकला व मग मी सूर्य मावळलाच नाही तर या दुष्ट विचारचक्रातून बाहेर पडलो व सूर्याने नियमितपणे उगवलेच पाहिजे व नियमानुसार मावळलेच पाहिजे, या सारासार विचारापर्यंत मी येऊन पोहोचलो व सूर्य मावळताना ढगावर उमटणाऱ्या संध्यारागात मी हरवलो व बालकवींच्या या ओळी गुणगुणू लागलो.

उठति वरति जलदावरती, अनंत संध्या राग पहा।
सर्व नभावर होय रेखिले, सुंदरतेचे रूप महा।।

❖❖❖❖❖